


दैनिक विश्वजगत

RNI No:- MAHMAR/2023/86213

https://epaper.dainikvishwajagat.com

मुख्य संपादक गजानन काटे : 9096873185

E-mail : dainikvishvjagato101@gmail.com



■ बुलडाणा ■ वाशिम ■ अकोला ■ अमरावती ■ यवतमाळ ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ परभणी ■ जालना ■ नाशिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ जळगाव खान्देश ■ धुळे ■ रायगड ■ ठाणे

रविवार दिनांक 22 डिसेंबर 2024 | वर्ष : 1 ले | अंक : 359 वा | पाने : 4 | किंमत : 5 रुपये | 9096873185


# राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर



राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार देखील पार पडला. त्यानंतर हिवाळी अधिवेशही झालं. मात्र, मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन आठवडा झाला तरी खातेवाटप झालं नव्हतं. मात्र, अखेर आज (२१ डिसेंबर) राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर झालं आहे.

यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखातं, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास व गृहनिर्माण आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क खातं देण्यात आलं आहे.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या आधी मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला होता. त्यानंतर हिवाळी अधिवेशन सुरु असताना खाते वाटप होईल असं वाटतं होतं. मात्र, आठवडा झाला तरी खातेवाटप होत नव्हतं. मात्र, आज अखेर खातेवाटप जाहीर करण्यात आलं आहे. खरं तर महायुतीत गृहखात्यासाठी शिवसेना (शिंदे) आग्रही असल्याचं बोललं जात होतं.


मात्र, गृहखातं सोडण्यास भाजपाने नकार दिला होता. अखेर गृहखातं आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठेवण्यात आलं आहे.

| क्रमांक | मंत्र्यांचं नाव | खातं |
|---|---|---|
| १ | देवेंद्र फडणवीस | गृहखातं |
| २ | एकनाथ शिंदे | नगरविकास आणि गृहनिर्माण |
| ३ | अजित पवार | अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क |
| ४ | चंद्रशेखर बावनकुळे | महसूल |
| ५ | राधाकृष्ण विखे पाटील | जलसंधारण |
| ६ | हसन मुश्रीफ | वैद्यकीय शिक्षण |
| ७ | चंद्रकांत पाटील | उच्च तंत्र शिक्षण |
| ८ | गिरीश महाजन | जलसंपदा |
| ९ | गुलाबराव पाटील | पाणीपुरवठा |
| १० | धनंजय मुंडे | अन्न व नागरी पुरवठा |
| ११ | दादाजी भुसे | शालेय शिक्षण |
| १२ | गणेश नाईक | वनखातं |
| १३ | संजय राठोड | माती व पाणी परीक्षण खात |
| १४ | मंगलप्रभात लोढा | कौशल्य विकास |
| १५ | उदय सामंत | उद्योग व मराठी भाषा |
| १६ | जयकुमार रावल | विपणन |
| १७ | पंकजा मुंडे | पशुसंवर्धन आणि पर्यावरण |
| १८ | अतुल सावे | ओबीसी विकास, दुग्धविकास |
| १९ | अशोक उईके | आदिवासी विकास |
| २० | शंभूराज देसाई | पर्यटन व खाण स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय |
| २१ | आशिष शेलार | माहिती व तंत्रज्ञान |
| २२ | दत्तात्रय भरणे | क्रीडा व अल्पसंख्याक विकास |
| २३ | अदिती तटकरे | महिला व बालविकास |
| २४ | शिवेंद्रराजे भोसले | सार्वजनिक बांधकाम |
| २५ | माणिकराव कोकाटे | कृषी |
| २६ | नरहरी झिरवाळ | अन्न व औषध प्रशासन |
| २७ | जयकुमार गोरे | ग्रामविकास आणि पंचायत राज |
| २८ | संजय शिरसाट | सामाजिक न्याय |
| २९ | भरत गोगावले | रोजगार हमी व फलोत्पादन |
| ३० | नितेश राणे | मत्स्य आणि बंदरे |
| ३१ | प्रताप सरनाईक | परिवहन |
| ३२ | बाबासाहेब पाटील | सहकार |
| ३३ | मकरंद पाटील | मदत व पुनर्वसन |
| ३४ | प्रकाश आबिटकर | सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण |
| ३५ | संजय सावकारे | वस्त्रोद्योग |
| ३६ | आकाश फुंडकर | कामगार |
| क्रं.राज्यमंत्रीराज्यमंत्री | | |
| १ | माधुरी मिसाळ | सामाजिक न्याय,अल्पसंख्याक विकास वैद्यकीय शिक्षण |
| २ | आशिष जयस्वाल | अर्थ आणि नियोजन आणि विधी व न्याय |
| ३ | इंद्रनील नाईक | उच्च आणि तंत्र शिक्षण आणि आदिवासी विकास |
| ४ | मेघना बोर्डीकर | सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण |
| ५ | योगेश कदम | गृहराज्य शहर |
| ६ | पंकज भोयर | गृह निर्माण |

## राष्ट्रधर्म युवा मंच तर्फे आज 'सेवा गौरव` पुरस्काराचे वितरण

### आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांच्या शुभहस्ते होणार वितरण सोहळा











नांदुरा : राष्ट्रधर्म युवा मंच तर्फे दिले जाणारे 'सेवा गौरव' पुरस्कार नुकतेच जाहीर झाले आहेत. त्यामध्ये नांदुरा येथील शेतकरी कन्या पुत्र अभ्यासिकेचे प्रणेते व शेतकरी कन्या पुत्र एमपीएससी यूपीएससी शैक्षणिक क्रांती संघटनेचे संस्थापक राजेश गावंडे यांनी बुलढाणा जिल्ह्यात सुरु केलेल्या शेतकरी कन्या पुत्र अभ्यासिकेच्या माध्यमातून 200 पेक्षा जास्त आर्थिक, दुर्बल शेतकऱ्यांची मुले शासकीय सेवेत रुजू झाली आहेत तसेच त्यांच्या जि प शाळेतील 20 वर्षापासून सुरु असलेले उन्हाळी वर्ग तसेच विद्यार्थी व स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांसाठी मार्गदर्शन शिबीरे या शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना राष्ट्रधर्म युवा मंच तर्फे यावर्षीचा सेवा गौरव पुरस्कार घोषित झाला आहे. यांचेसह अनेक वर्षापासून भजन, कीर्तन प्रबोधनाद्वारे सातत्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व इतर महापुरुषांच्या विचारांचा आपल्या कीर्तन व प्रवचनातून प्रसार करणारे श्री सुनील गाईनकर यांना तसेच गेल्या दहा वर्षापासून बुलढाणा जिल्हा व जिल्हा बाहेरील रुग्नांना आरोग्यदुत म्हणून सेवा दिल्याबददल मोताळा येथील विकास सिंह राजपूत यांना आणि अबॅकस,वैदिक गणित विषयात देशभरात ६८ केंद्रांच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल समर्थसिंह पाटील आणि ग्रामस्वछता, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, व्यसनमुक्ती अभियान, सर्वाधर्मीय समुदायिक प्रार्थना या सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्याबद्दल माटरगाव येथील प्रदीप गणेशराव सारोळकर यांना सुद्धा 2024 चा 'सेवा गौरव' पुरस्कार जाहीर झाला आहे.

गुरुदेव सेवाश्रमाचे आचार्य श्री हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या व अल्पावधीतच विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये विस्तार पावलेल्या राष्ट्रधर्म युवा मंच या होतकरू तरुणांच्या समाजसेवी संघटनेने अनेक समाजसेवी उपक्रम राबवत राष्ट्रधर्म युवा मंच पर्यावरण,शिक्षण,आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहे.या सेवाकार्यात जास्तीत जास्त तरुणांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने राष्ट्रधर्म युवा मंच बुलढाणा यांचे वतीने या वर्षीपासून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या जिल्ह्यातील उपरोक्त सेवा व्रतींची सेवा गौरव पुरस्कारासाठी घोषणा केली आहे.श्रद्धेय आचार्य श्री हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांच्या शुभ हस्ते ग्राम वाडी पोफळी ता. मोताळा या ठिकाणी पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रधर्म युवा मंच व श्री गुरुदेव सेवा मंडळ वाडी पोफळी यांनी केले आहे .

## शरदचंद्रजी पवार परभणी दोऱ्यावर सोमनाथ सुर्यवंशी कोटुबियांची घेतली भेट



विश्वजगत
गौतम ढाले
विशेष बातमी

परभणी -राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष तथा खासदार शरदचंद्रजी पवार यांनी शनिवारी परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना करण्यात आलेल्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली 11 डिसेंबर रोजी निषेध मोर्चा मधील निष्पाप आंदोलन कर्त्यावर पोलिसांनी केलेल्या कोंबिंग ऑपरेशन दरम्यान झलेल्या मारहाणीत मयत सोपान सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी व परभणीतील झालेल्या प्रकरणा विषयी राज्य सरकारने जी महिती दिली ती माहिती न पटणारी होती म्हणून मी प्रत्यक्ष भेटीला आलो असे पत्रकारांना सांगितले या दरम्यान मृत्यू झालेल्या पीडित कुटुंबियांची खासदार शरदचंद्र पवार यांनी भेट घेऊन आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते विजय वाकोडे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने नुकतेच निधन झाले त्यांच्याही परिवाराची भेट खासदार शरदचंद्रजी पवार यांनी घेतली त्यावेळेस त्यांच्यासोबत खासदार फौजिया खान, खासदार निलेश लंके, खासदार बजरंग सोनवणे, माजी मंत्री राजेश टोपे, जिल्हा अध्यक्ष विजय गव्हाणे, विजय भांबळे, भीमराव हातीअंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती पुढे बोलताना खासदार पवार म्हणाले की घडलेला प्रकार अतिशय गंभीर आणि निंदनीय आहे या सर्व प्रकरणांमध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे राष्ट्रवादीत कॉंग्रेस पार्टी राज्य सरकारकडे या घटनेचा पाठपुरावा करेल या प्रकरणाविषयी सरकारने जी माहिति दिली ती माहिती न पटणारी होती म्हणून मी प्रत्यक्ष भेटीला आलेलो आहे आणि प्रत्यक्ष वस्तू स्थिती समजून घ्यावी या हेतूने मी परभणी जिल्ह्यात आलो आहे असेही खासदार शरद चंद्र पवार बोलले

लोकसभेचे विरोधी पक्ष नेते तथा काँग्रेसचे नेते खा. राहुल गांधी सोमवारी 23 रोजी परभणी दौऱ्यावर येणार आहेत मयात सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट खासदार राहुल गांधी घेणार आहेत सोमवारी त्यांचे दिल्ली येथून नांदेड विमानतळावर आगमन होईल दुपारी पावणेतीन वाजता सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना परभणी येथे ते भेट देणार आहेत




दैनिक विश्वजगत
रविवार दिनांक 22 डिसेंबर 2024
साहित्य जगत
भगवान राईतकर सर
( अतिथी साहित्य संपादक, 9730332151)





## शिक्षा, काळ्या हवेची!

दसरा आटोपून दिवाळी येऊ लागली. दक्षिण दिल्लीच्या वसंतविहारमधील तीन वर्षांच्या आद्याचा आणि पाच वर्षांच्या आकाशचा खोकला काही केल्या थांबेना. घरात एअरकंडिशनर व एअर प्युरिफायर, शाळेला जाण्या-येण्यासाठी बी.एम.डब्ल्यू. गाडी. खोकला सुरू होताच आद्या-आकाशचे आईवडील अनुष्का व राकेश यांनी वेळ न दवडता उत्तम डॉक्टर गाठून वाफारा व इतर सर्व औषधं चालू केली. पंधरा दिवस झाले तरी खोकला कमी होण्याची लक्षणंच नव्हती. हे पाहून त्यांनी मागील दोन वर्षांप्रमाणे यंदाही दोन महिने जम्मूला जाऊन राहण्याचा निर्णय घेतला.

त्यांच्या घरापासून काही अंतरावर दिल्लीतील धारावी – कुसुमपूर पहाडी झोपडपट्टी आहे. तिथल्या कच्च्या बांधकामाच्या खोलीत दोन वर्षांचा साकेत नाकाला लावलेल्या नेब्युलायझरच्या (द्रव औषधाची वाफ करून ती मास्क लावलेल्या नळीतून पोचवणारे उपकरण) नळीशी खेळतोय. चार वर्षांचा अक्षय खोकत-खोकत त्याला ते कधी मिळेल याची वाट पाहतोय. कचरा गोळा करणाऱ्या मथुराबाई आणि रोजीवर जाणारे नवनाथ यांच्यासाठी हिवाळा म्हणजे छातीत कळ! त्यांच्या दोन्ही मुलांचा खोकला जन्मापासून पिच्छा सोडत नाही. उपचारात कधी हजार, कधी दोन हजार जाऊ लागले. डॉक्टरकडे जाऊन वाफ घेण्यासाठी दरवेळी ९०-१०० रुपये जायचे. शिवाय रोजगार बुडायचा. म्हणून ३०० रुपयांत वाफेचं उपकरण घेतलं. त्यात घालायचं औषध अधिक पुरवलं पाहिजे. म्हणून डॉक्टरांनी एकासाठी सांगितलेलं औषध निम्मं करून त्यात दोघांचं भागवायचं. या दोन्ही चिमुकल्यांना ढास लागते. उलट्या होतात. डोकं-छाती-पोट दुखत राहतं. दोघंही रात्रभर सारखं तळमळत-कळवळत राहतात. हतबल आईबापांच्या कानात खोकला घुमत, त्यांना कासावीस करत राहतो. नोव्हेंबर महिन्यात दिल्ली परिसरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स ) ५०० पर्यंत गेला. ही भयंकर हवा सार्वजनिक आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. याची दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली व 'राष्ट्रीय राजधानी प्रदेशा'मधील (नॅशनल कॅपिटल रिजन) नोएडा, गुरुग्राम, फरिदाबाद व गाझियाबाद या भागांतील सर्व पाच हजार ६१९ विद्यालये बंद ठेवण्याचा आदेश दिला. सुमारे ४५ लाख बालके घरात कोंडली गेली.आपलं आरोग्य उत्तम व सुखदायी ठेवण्यासाठी हवेचा निर्देशांक ० ते ५० असणे आवश्यक आहे. ५१ ते १०० निर्देशांकाची हवा ही सामान्य असते. १०१ ते १५० गुणवत्तेच्या हवेमध्ये संवेदनशील व्यक्तीचे आजार बळावतात. १५१ ते २०० गुणवत्तेच्या 'अपायकारक' हवेमध्ये श्वसनाचे विकार साथीसारखे पसरतात. २०१ ते ३०० निर्देशांकाची हवा आरोग्यास 'घातक' असून तर ३०१ ते ५०० निर्देशांकाची 'भयंकर विषारी' हवा संचारबंदी आणते.२०१६ पासून आजवर दिल्लीतील हवेची गुणवत्ता ३०० ते ९०० यांमध्ये हेलकावे खात राहतेय. धुकं आणि प्रदूषण यांच्या मिश्रणातून तयार होणाऱ्या स्मॉगमुळे दृश्यमानता १०० मीटरवर येऊन ठेपते. विमान व रेल्वे प्रवास ठप्प पडतो. रस्त्यांवर मंदगती वाहनांची दाटी होते. गलिच्छ हवेमुळे दरवर्षी शाळा १०-१५ दिवसांसाठी बंद ठेवाव्या लागतात. सर्व इस्पितळं श्वसनविकारांच्या रुग्णांनी भरून जातात. कित्येकांना खाट मिळत नाही.दिल्लीतील शाळांत सुमारे नऊ लाख विद्यार्थ्यांनी 'शिक्षणाचा हक्क' योजनेत प्रवेश घेतला आहे. 'शाळा बंद' झाल्यावर आठ दिवसांत वंचित वर्गातील पालकांनी सर्वोच्च न्यायालयाकडे प्रत्यक्ष वर्गांच्या निलंबनाचे पुनरावलोकन करण्याची विनंती केली. अर्जदारांची बाजू मांडताना वरिष्ठ विधिज्ञ मेनका गुरुस्वामी म्हणाल्या, ह्यह्लआमच्या घरातील व आमच्या भागातील हवा स्वच्छ नाही. आमच्याकडे ऑनलाइन क्लासेसमध्ये सहभागी होण्यासाठी उपकरणे लॅपटॉप वा मोबाइल नाही. अनेक सरकारी शाळांमध्ये हवा शुद्धीकरण यंत्रे बसवली आहेत. बहुतेक गरीब आपल्या मुलांना त्यांच्या घराजवळच्या शाळेत पाठवतात. (लांब अंतराचा प्रवास हा केवळ उच्चभ्रूंना परवडतो.) त्यांना मध्यान्ह भोजन हेदेखील एक प्रोत्साहन असते. ज्या पालकांना आपल्या मुलांना शाळेत पाठवायचे आहे, अशांसाठी काही वेगळी प्रणाली असावी.' आपण शाळेतच 'आपला मेंदू आणि शरीर यांचं कार्य व्यवस्थितपणे चालण्यासाठी उत्तम व पुरेसा ऑक्सिजन अनिवार्य आहे.' हे शिकतो. प्राणवायूच गचाळ असेल तर काय, हे मात्र त्यात लिहिलेलं नव्हतं. त्याच्या प्रात्यक्षिकासाठी 'चलो दिल्ली!' पाच वर्षांपूर्वी दिल्लीत जन्मलेल्या चिमुकल्यांना १,८२६ पैकी केवळ १० दिवसच चांगली हवा लाभली. पावसामुळे ६३२ दिवस हवा मध्यम होती. ८१ दिवसांमध्ये, हवा अतिशय गंभीर होती. त्यांना तब्बल ८२६ दिवस 'हानीकारक' हवेचा सामना करावा लागला आहे.जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार प्रदूषित हवेतील सूक्ष्मकण पी.एम.२.५ (२.५ मायक्रॉन जाडीचे- आपल्या केसांची जाडी ३० ते ४० मायक्रॉन असते.) यांचं प्रमाण एक घनमीटर हवेत पाच मायक्रोग्रॅमपेक्षा अधिक नसावे. एका दिवसात १५ मायक्रोग्रॅमहून अधिक सूक्ष्मकण शरीरात जाऊ नयेत. प्रदूषणग्रस्त दिल्लीत कोणाला व कशी हवा मिळते, याचं सर्वेक्षण मागील वर्षी केलं होतं. 'श्रीमंत कॉलनीत सुरक्षिततेची सर्व साधने वापरणाऱ्या मुलाच्या शरीरात ३६.६ मायक्रोग्रॅम तर झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलाच्या शरीरात १४९ मायक्रोग्रॅम दूषित सूक्ष्मकण शिरकाव करतात.' असं त्यात लक्षात आलं. हे सूक्ष्मकण जात-धर्म-वर्ग असा कोणताही भेद न करता नाकावाटे शरीरात घुसतात आणि शरीरातील प्रत्येक यंत्रणेवर वाईट परिणाम करतात. मेंदू, फुप्फुस, हृदय, मूत्रपिंड, यकृत, आतडे, हाडे, प्रजनन प्रणाली व अंत:स्त्रावी प्रणाली किंवा कोणतीही यंत्रणा प्रदूषणाच्या तावडीतून सुटू शकत नाही.

# ॥ जैसी संगत वैसी रंगत ॥

माणसाच्या वृत्तीला पाहून ,आपण तो व्यक्ति कोणत्या व्यक्तिमत्वाच आहे याचा अंदाजा लावू शकतो. अश्या लोकांच अभ्यास केल तर , लक्षात येते की , त्यांच्या आयुष्यात त्यांच्यावर संगतीचा परिणाम हा जास्त प्रमाणात पडलेला आहे असे दिसून येते . व्यक्तिची वृत्ती चांगली असो वा वाईट परंतू त्याचा प्रभाव आणि परिणाम काही प्रमाणात पडतोच. चांगली संगत ही व्यक्तिला चांगल्या मार्गाकडे तर , वाईट संगत ही व्यक्तिला वाईट मार्गाकडे नेत असते.

आधीच्या समाजात असो किंवा आत्ताच्या समाजात असो कोणत्याही व्यक्तिला दुर्गुण घ्यायला जास्त अक्कल लागत नाही कारण, सकारात्मकता ऐवजी नकारात्मकतेचा प्रभाव हा लवकर पडत असतो. कुसंगत करून सात्विकतेच्या भिंती पाडणे हे अत्यंत सोपे कार्य असते परंतू , कुसंगती किती घातक ठरत असते याचा अंदाजा मात्र कुणालाच नसतो.
रामायण मधील महत्वपूर्ण पात्र मंथराच्या संगतीमुळे राणी कैकयीची मती भ्रष्ट झाली होती ज्यामुळे तिच संपूर्ण व्यक्तिमत्व बदललं . त्यांच्या एका निर्णयामुळे संपूर्ण रामायण घडल.

चांगली संगत ही चांगल्या गोष्टींसाठी परावृत्त करीत असते तर , वाईट संगत ही वाईट गोष्टींसाठी परावृत्त करीत असते.
जुने व्यक्ति नेहमी सांगत असायचे. कुठलही काम करतांना अगोदर विचार करणे गरजेचे आहे त्याचप्रकारे संगत करतांना अगोदरच विचार करणे अत्यंत आवश्यक आहे .
आपल्या तळहातांना जर, आपण कडूलिंबाची फुले चोळली तर, तळहाताला मोग-याचा सुवास कुठून येणार . हे समजणे गरजेच आहे.

आपल्या चुकीच्या संगतीमुळे अथवा चांगल्या संगतीमुळे फक्त आपली विचारसरणीच बदलत नाही तर आपल राहणीमान, आपल्या सवयी आणि आपलं आयुष्य जगण्याच मार्ग



ही बदलत असतो म्हणूनच नेहमी चांगल्या लोकांचीच संगत केली पाहिजे ज्यामुळे आपल्या दृष्टिकोनात फरक पडतो.

हिंदीमध्ये एक मुहावरा आहे ॥ जैसी संगत वैसी रंगत ॥ हे चुकीच नाही.यासंदर्भातील कित्येक उदाहरण आपल्याला बघायला मिळतात.
चांगला योद्धा, दानशूर म्हणून किर्तीमान व्यक्तीत्व असणारा , राधेय म्हणून ओळखला जाणारा कर्ण हा सुद्धा जगापुढे बोध घेण्यासारख उदाहरण आहे. चुकीच्या संगतीमुळे एवढा शूरवीर कर्ण महाभारताच्या युद्धात अयशस्वी ठरला.
आपण ज्या लोकांची संगत करीत असतो त्यांच्या सवयीच नाही तर स्वभावगुणांचा सुद्धा परिणाम आपल्यावर होत असतो. व्यक्तीत्व सुंदर बनविण्यासाठी चांगल्या संगती ला वाव देणे शिकावे . चांगली संगत व्यक्तीला नेहमीच सशक्त, प्रगत बनविते तर , अयोग्य संगत व्यक्तीला निर्बल, भ्रष्ट बनविते.
कित्येक संतांनी चुकीच्या संगतीचे तोटे किर्तनातून सांगितले आहे . तुकाराम महाराजांनी सुद्धा अभंगातून कुसंगतीमुळे आयुष्य कसं होवू शकते हे सांगितल आहे.

ढेकणाचे संगे हिरा जो भंगला |
कुसंगे नाडला साधु तैसा ॥
ओढाळाच्या संगे सात्विक नासली |
क्षण एक नाडली समागमे
डांकाचे संगती सोने हीन जाले
मोल ते तुटले लक्ष कोडी ॥
विशाने पक्वाने गोड कडू जाली |
कुसंगाने केली तैसी परी ॥
भावे तुका म्हणे सत्संग हा बरा
कुसंग हा फेरा चौ-याशींचा ॥ - संत तुकाराम महाराज

संत तुकाराम महाराजांच म्हणणं असं आहे की, हिरा कितीही चमकदार,अमूल्य असला तरी ढेकळाच्या संपर्कात आले की, त्याच्या रक्ताने तो भंग पावतो त्याप्रमाणे दुर्जन व्यक्तीच्या संगतीमुळे साधु व्यक्तीही बिघडतो. घाणेरडे असते त्याशी संबंध आला असता सात्विक पदार्थही नासले जातात अश्याप्रकारे दुष्टांशी, चुकीच्या व्यक्तींशी एक क्षण मैत्री केली तरी त्यामुळे चांगले लोक नासले जातात. सोन कितीही महाग असले तरी त्यात अशुद्धता मिसळली की , त्यामुळे त्याचे मोल अत्यंत कमी होऊन जाते. गोड पक्वान्न विषाच्या संगतीने कडू होतात. वाईट संगतीचे असे फळ असते.

संत तुकाराम महाराज अभंगातून सांगण्याच प्रयत्न करीत होते की , चांगल्या संगतीत राहणे हेच उत्तम असते. दुर्जनाची संगती मनुष्याला चौऱ्यांशी लक्ष योनींचा फेरा घडवते. बोर किंवा बाभळीच्या झाडाजवळ केळीचे झाड जर वाढले तर केळीचे पाने फाटून जातात. संगतीने विचार चांगले अथवा वाईट होतात म्हणूनच आपल्या आयुष्यात संगत खुप महत्वाची आहे.
या जगात क्वचितच असे व्यक्ती आढळणार जे चिखलाची संगत करून कमळासारखे फुललेले आहेत नाहीतर संगतीमुळे स्वत:ला उध्वस्त करणाऱ्या लोकांची संख्या समाजात जास्त प्रमाणात आढळते त्यामुळेच , नैतिकतेचा मार्ग कधीच सोडू नये. योग्य-अयोग्य याची पारख करण्याची क्षमता स्वत:मध्ये ठेवावी.

**श्रीमती नूतन अशोक मुळणकर**
नांदगाव



# स्त्रियांचे सौभाग्य

सौंदर्य हे प्रत्येकच गोष्टीत असतं.परंतु ते बघण्यासाठी मनाची सुंदरता असणं फार गरजेचं असतं.. म्हणजेच मनाच्या सौंदर्याला जास्त महत्त्व आहे.. प्रत्येकाचा सौंदर्याकडे बघण्याचा दृष्टिकोन मात्र फार वेगळा असु शकतो..

स्त्री ही एक ईश्वराने घडवलेली सुंदर प्रतिकृती आहे. या प्रतिकृती शिवाय सृष्टीची कल्पनाच होऊ शकत नाही. तसेच मातृत्व ही पण एक खूप मोठी शक्ती आहे.आणि ती फक्त देवाने स्त्रीलाच बहाल केली आहे.खरोखरंच हेच सर्व स्त्रियांचे सौभाग्यच समजलं जातं नाही का?.. तेंव्हा सौभाग्य म्हणजे काय? तर सौभाग्याचे अनेक अर्थ निघतात. चांगलं प्रारब्ध, चांगलं नशीब, चांगलं भाग्य, असे कितीतरी अनेक अर्थ होतात. स्त्रीचे एकदा लग्न झाले की ती सौभाग्यवती झाली असे म्हणतात!... खरंच स्त्रीचा जन्म हा भारतीय संस्कृतीचा एक अनमोल ठेवा आहे. म्हणजेच आपल्या भारतीय संस्कृतीचे केंद्रस्थान स्त्रीच असते असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.प्रत्येक घरातील स्त्रीला सौभाग्याचा अलंकार मानले जाते.तिचे अस्तित्व जर घरातून वजा केले तर घराला अवकळा प्राप्त होते. घरामध्ये एक प्रकारची उदासीनता निर्माण होते. तिच्यामुळेच घराला घरपण येत असते. घरात आनंदाचा वास राहतो. पुरुष हे बाहेरचे सर्व व्यवहार सांभाळतात, तर स्त्री पूर्णपणे घराची जबाबदारी सांभाळते.. आपलं कुटुंब, त्यांचे व्यवस्थापन, मुलांचे पालन पोषण ,यातच स्त्रियांना खरा आनंद मिळतो व यालाच त्या आपलं सौभाग्य मानतात.. सौभाग्य स्त्रीलाही असते व पुरुषालाही असते. पुरुषालू आयुष्यात उत्तम जोडीदार स्त्री मिळणे, चांगली सुशील स्त्री मिळणे हे त्याचं सौभाग्यच असतं. तिच्यामुळे त्याचा संसार हा सुखाचा होत असतो. परंतु स्त्रीचे सौभाग्य म्हणजे तिला चारित्रवान, शीलवान, प्रेमळ, सदाचारी पती मिळणे, तसेच चांगल्या परिवाराशी तिचे नाते जोडले जाणे होय.स्त्रीचे सौभाग्य एका अर्थी तिचे कुंकू असेही मानल्या जाते. आणि म्हणूनच हिंदू संस्कृतीमध्ये नवऱ्याला 'कुंकवाचा धनी' असेही म्हंटले जाते. कुंकवामुळे स्त्रीची आत्मशक्ती जागृत होते. त्यामुळे तिच्यात शक्तितत्व आकृष्ट करण्याची प्रचंड क्षमता निर्माण होते. तसेच कुंकवामध्ये म्हणजेच स्त्रीच्या सौभाग्यामध्ये तारक व मारक शक्ती तत्त्व आकृष्ट करण्याची प्रचंड क्षमता असते असे समजतात.. आज पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीला आयुष्यभरासाठी कोणाशी तरी जोडून राहावेच लागते. उदा. लहानपणी वडील सांभाळ करतात, तारुण्यात भाऊ संरक्षण करतो, लग्नानंतर पती संरक्षण करतो तर उतार वयात म्हणजेच म्हातारपणी मुलगा सांभाळ करतो. या एवढ्या सर्व व्यक्ती तिच्या आयुष्यात असणं खरे तर हे देखील तिचे सौभाग्यच म्हणावे लागेल..



काजळ, कुंकू, मंगळसूत्र सौभाग्याचं लेणं....
स्त्रीच्या पदरी पडलेलं हे सौभाग्याचं वाणं....

सौभाग्याचे वास्तविक पाहता अनेक अर्थ आहेत. सौभाग्य म्हणजे सौंदर्य. तसेच सौभाग्य म्हणजे नशीब किंवा प्राक्तन म्हणता येईल. बऱ्याचदा आपण आपल्या नेहमीच्या वापरात असलेले शब्द म्हणजे...मुलगी चांगल्या घरी पडली तर मुलीचे भाग्य जोरदार आहे. मुलींनं नशीब काढलं ..घरदार, शेतीवाडी सर्व काही आहे..म्हणजे मुलीचं भाग्य व सौभाग्य जोरावर आहे असेच म्हंटले जाते.. तिला अंगावर भरपूर दागिने घातले असतील तर मुलीचं सौभाग्य समजलं जातं. तसेच सवाष्ण स्त्रीला सौभाग्यवती म्हंटले जाते. सवाष्ण म्हणजेच ज्या स्त्रीचा पती जिवंत आहे तीला सौभाग्यवती समजल्या जाते.

"दर्पणी बांधूनी सौभाग्य लेणं घालते....
कुंकुम भाळी ते ठसठशीत कोरते....
दर्पणा सांग कशी मी दिसते...
प्रतिबिंब ते गोड गाली हसते"...

ती दागदागिने घालून, गजरा माळून इ. साज शृंगार करून सगळीकडे मिरवू शकते हेही तिचे सौभाग्यच समजले जाते. सौभाग्यवती स्त्रीच्या जीवनात अहेवपणी मरण येण्याला खूप महत्त्व आहे. अहेवपण म्हणजेच अखंड सौभाग्य होय. स्त्री जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत तिला पती सुख मिळणे यालाही स्त्रीचे सौभाग्यच मानले जाते. प्रत्येक स्त्रीला आपलं सौभाग्य कायम टिकून राहावं नेहमी असंच वाटत असतं...

लग्न झालेल्या स्त्रीच्या नावाआधी सौ. असे लिहितात. या सौ.चा अर्थ म्हणजे सौभाग्यवती किंवा सौभाग्यकांक्षिणी असा होतो. पती हयात नसलेल्या स्त्रीच्या नावामागे श्रीमती असे लिहितात.तसेच सवाष्णीने मोठ्यांना नमस्कार केला असता तिला सौभाग्यवती भव असा आशीर्वाद दिला जातो. याचाच अर्थ तिला तिचं कल्याण होवो. तुझ्यावर कुठलेही संकट येऊ नये व तुझ्यावर देवाचा कृपाप्रसाद राहो.. असा होतो. तसेच तुझ्या पतीला उदंड आयुष्य मिळो असाही होतो.. कारण नवऱ्यामुळेच तिला सौभाग्य प्राप्त होत असते..

लग्नानंतर मुलीला दूरावते माहेर....
पति देवामुळे मिळतो सौभाग्याचा आहेर....

अशा या अनेक सौभाग्याच्या व्याख्या आपण बघितल्या आहेत. चांगली अपत्य जन्माला आल्यानंतर व ती मोठी झाल्यावर चांगली निघणं हेही एक सौभाग्याचाच भाग आहे.

**सौ.माधुरी ग.कुळकर्णी**
मेहकर
९९२१५६७९०७

## महागाई

आता काय करू बाई.
सुचू नाही देत महागाई.
अन्न धान्याचे भाव
आकाशाला भिडले
आम्हा गरीबाचे तर.
कंबर्डेच जणू मोडले
दुधासाठी बाळ करते आई
आई...
सुचू नाही देत महागाई .
बारा महिने बदलत नाही
आमचे चोळी लुगडे.
घरात खाण्यासाठी होतात
आता नेहमीच झगडे
पोट भरून कुणालाच
जेवण मिळत नाही...
सुचु नाहि देत् महागाइ .
अशा परिस्थिति मध्ये.
कठीण झाले जगणं.
आज स्वस्त झाले
आहे आपले मरण.
आम्हा गरिबांची हाक.
कुणी एकतच नाही...
सुचू नाही देत महागाई.

**प्रभा डी.तेलगोटे**
अकोट जि. अकोला.



## संविधान दिन

संविधान आहे जगात खुपच महान
लहान मोठे सर्व मिळून राखू हो मान

कायदा आहे सर्वांसाठी खुपच भारी
अन्याय जूलूम नाही येथे हे कुणावरी

संविधान म्हणजे सर्वा साठी वरदान
भारत देशाची वाढली संविधाने शान

एकता समता एकात्मता देशात खुप
नागरीकाचे कल्याण आहे हो अमाप

डॉ बाबासाहेब आंबेडकर हुशार भारी
संविधान लिहुन दाखवली कामगिरी

कायदा आहे सर्वांसाठी येथे हो समान
गरीब श्रीमंत यांना मिळतो हो सन्मान

आरक्षण देउन केले गरीबाचे येथे भले
गोरगरिबांचे संविधाना मुळे बरे झाले

26 नोव्हेंबर संविधान दिनखुप महान
सर्व करूया संविधान दिनास हे वंदन.

**श्री कळसे बी.जी.**अध्यापक
नांदेड.



## विठ्ठला...!

राउळी नारीस का येथे मनाई विठ्ठला
उंब-याला थांबली आहे जनाई विठ्ठला

सांग जाऊ मी कुठे सोडून देवा पंढरी
बाप माझा तूच आता तूच आई विठ्ठला

माधवा मी नाम घेतो बोल माझे बोबडे
तूच अल्ला तूच येशू तूच साई विठ्ठला

सावळे हे रूप सुंदर वेड लावी केशवा
भेटण्याची या जिवाला फार घाई विठ्ठला

काय झाला वाद सांगा पांडुरंगा एवढा
थांबली का कोपऱ्याला दूर माई विठ्ठला

लागली का ओढ आता दर्शनाची एवढी
वाळवंटी चाललो वारीत पायी विठ्ठला

**सोपान ज्ञा.डोके**
रामपुरीकर
मो.9518707344




टिप – साहित्यजगत या पेजवर प्रकाशित होणाऱ्या लेखातील लेखकांच्या मताशी संपादक महोदय किंवा पेपर सहमत असेल असे नाही.

VISHWA JAGAT -Printed & Published by GAJANAN RAJARAM KATE Printed at GAJANAN Printers : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.)1 and Published at VISHWA JAGAT Office : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.) Editor GAJANAN RAJARAM KATE Mob.No.9096873185 RNI No:- MAHMAR/2023/86213

विश्वजगत हे पत्र मालक, प्रकाशक, गजानन राजाराम काटे यांनी मुद्रक गजानन प्रिंटींग प्रेस, मुद्रण स्थळ FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून मुद्रित करून - कार्यालय : विश्वजगत कार्यालय,FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून प्रकाशित केले. संपादक : गजानन राजाराम काटे मो. 9096873185 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतील. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार कार्यकारी संपादक जबाबदार राहतील.) सर्व वाद विवाद अकोला न्यायालयांतर्गत राहील.) Email : dainikvishvjagato101@gmail.com RNI No:- MAHMAR/2023/86213

१ २ ३ ४ ५ ६



महत्त्वाचे

## ज्याच्या हातामध्ये ईव्हीएम त्याची लोकशाही:संजय राऊतांचा आरोप

वृत्तसंस्था - गेली सत्तर वर्षात अशा प्रकारच्या निवडणुका आम्ही पाहिल्या नसल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. ज्यांनी आम्हाला मतदान केले, त्यांचे मतदान आमच्यापर्यंत पोहोचले नाही, अशी लोकांची भावना आहे. लोकांच्या या संतप्त भावना आहेत. त्याचा आम्ही आदर करून स्वीकार करत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. आता जे आमच्या सोबत आहेत, त्यांना घेऊन आम्ही पुढे जाणार असल्याचे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.आपल्या देशामध्ये ज्याच्या हातामध्ये ईव्हीएम त्याची लोकशाही, असे समीकरण झाले आहे. मात्र आता आम्ही पुढे जाणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. सरकार स्थापन झाले मात्र, मंत्रिमंडळ तयार होत नव्हते. मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला मात्र अद्याप खाते वाटप जाहीर होत नाही.

## विजय गोविंद राऊत यांचे निधन



बुलढाणा : सहकार विद्या मंदिर येथे कार्यरत कलाशिक्षक संजय राऊत यांचे वडील जेष्ठ सुतार कारागीर विजय गोविंद राऊत यांचे वयाच्या ८० व्या वर्षी २० डिसेंबरला वृद्धपकाळाने बुलढाणा येथे निधन झाले . त्यांच्या प्रश्चात तीन मुली , एक मुलगा , सुन , नातवंड असा आप्त परिवार आहे .

# दिव्यांगांसाठी केलेल्या कामाचे समाधान हे आनंद देणारे - उपजिल्हाधिकारी.






ठाणे ता - दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या योजना राबविताना येणाऱ्या अडचणींवर मात करून, नियमांच्या चौकटीच्या बाहेर जावून जेव्हा शासकीय अधिकारी या योजना दिव्यांग व्यक्तीपर्यंत पोहोचवतात तेव्हा त्या व्यक्तींना होणारा आनंद हा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असतो. त्यापेक्षा जास्त आनंद हा या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणारा अधिकारी जेव्हा सेवानिवृत्त होतो तेव्हा मागे वळून पाहताना दिव्यांग व्यक्तींसाठी जे काम केले याचे त्याला समाधान मिळते, असे वक्तव्य निवासी उपजिल्हाधिकारी संदीप माने यांनी आज केले.

सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा व्हावा यासाठी केंद्रशासनाच्या निर्देशानुसार आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनानुसार 19 डिसेंबर पासून ठाणे महापालिकेत सुशासन प्रशासन Good Goverence Week 2024 या सप्ताहाची सुरूवात झाली . या मोहिमेतंर्गत आज दिव्यांग व्यक्ती, विशेष शाळा, महिला व बालविकास कल्याणकारी योजना याबाबत माहितीपर चर्चासत्राचे आयोजन कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन कारण्यासाठी डॉ. तुशाबा शिंदे, संचालक प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभाग, भारत सरकार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी गणेश सांगळे, तहसीलदार किशोर मराठे, उमेश पाटील, उपायुक्त अनघा कदम, सहायक आयुक्त दशरथ वाघमारे, बाल संरक्षण अधिकारी रेखा हिरे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, ठामपा जिद्द शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना शेटे, सामाजिक कार्यकर्ते गौतम गायकवाड, समन्वय अधिकारी आधार कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# खिसमसच्या नावाखाली हिंदु संस्कृतीचे विभत्सीकरण थांबवावे

## शाळांमध्ये गुरु गोविन्दसिंगजी यांच्या परिवार बलिदानाच्या सन्मानार्थ बलिदान सप्ताह साजरे करावे - वि.ही.प ची मागणी




मलकापूर :आपला धर्म सोडून इतर धर्म स्विकारन्यासाठी मुघलांनी गुरुगोविंदसिंहजी यांचे पुत्र यांना अतोनात त्रास दिला मात्र त्यांनी मृत्यु स्वीकारले पण आपला धर्म सोडला नाही. अश्या या वीरांच्या स्मरणार्थ बुलढाणा जिल्हा मधील सर्व शाळेमध्ये गुरु गोविंद सिंह यांच्या परिवाराच्या या बलिदान करिता बलीदान सप्ताह म्हणून आयोजीत करणे बाबत आज उपविभागीय अधिकारी साहेब मलकापूर यांद्वारे जिल्हा अधिकारी साहेब बुलढाणा यांना एक निवेदन विश्व हिंदू परिषद बजरंग दल मलकापूर द्वारे देण्यात आले.

उपरोक्त निवेदन मध्ये नमूद करण्यात आले आहे की आपल्या भारत देशाच्या उज्वल व प्रगल्भ इतिहासा मधील शिख धर्म गुरू गोविंदसिंह यांच्या परिवाराने देश व धर्माकरीता चारशे वर्षापूर्वी २१ ते २७ डिसेंबर च्या दरम्यान धर्म करिता आपल्या प्राणांचे बलीदान देवून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला होता व त्यांच्या पावन बलिदानाला स्मरुन आपल्या देशातील संपुर्ण शाळेमध्ये सदरहू बलिदानाच्या सन्मानार्थ आठवण म्हणून दिनांक २१/१२/२०२४ ते २७/१२/२०२४ या कालावधी मध्ये बलिदान सप्ताह म्हणून आयोजीत करण्याकरीता योग्य ते दिशा निर्देश आपल्या स्तरावरुन बुलढाणा जिल्हयातील संपूर्ण शासकिय व खाजगी शाळांना देणे आवश्यक आहे. करीता सदरहू निवेदन आपल्या दिले आहे.

त्याच प्रमाणे खिश्चन धर्मियांच्या खिश्चन सना निमित्त काही खाजगी शाळांमध्ये 1 ते वर्ग ५ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्या निमित्त वेगवेगळ्या वेशभूषा करायला लावुन सदरहू आयोजनात हिंदी चित्रपटामधील काही अश्लील गाण्यांवर नृत्याचे कार्यक्रम ठेवून त्याव्दारे हिंदू संस्कृतीचे विभत्सीकरण करण्यात येत आहे, याबाबत बऱ्याच पालकांमध्ये नाराजी आहे, त्यामुळे सदरहु सक्तीचे आयोजन हे थांबविणे बाबत देखील आपले स्तरावरुन योग्य ते दिशानिर्देशन सर्व शासकिय व खाजगी शाळांना देणे आवश्यक आहे करीता सदरहू निवेदन आपल्या सेवेशी देण्यात येत आहे. तरी त्या प्रमाणे योग्य ते दिशा निर्देश सर्व शासकिय व खाजगी शाळांना देणे,बाबत आपल्या स्तरावरुन कार्यवाही आदेश देण्यात यावे हि विनंती. असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदनाच्या प्रतीलीपी मा.शिक्षणाधिकारी माध्य, जिल्हा परिषद, बुलढाण,मा. शिक्षणाधिकारी प्राथ, जिल्हा परिषद, बुलढाणा ,सर्व मुख्याध्यापक, बुलढाणा जिल्हा प्राथमिक व माध्यमिक शाळा यांना ठेवन्यात आले आहे निवेदन देण्या प्रसंगी साहेब कदमसर गुरुद्वारा सेवा समिती, सिंधी समाज कार्यकारणी, विश्व हिंदू परिषद बजरंग दल चे असंख्य कार्यकर्ता यावेळेस उपस्थित. होते.

# प्रताप मध्ये विद्यार्थ्यांनी घेतले रायफल चे प्रशिक्षण






अमळनेर : अमळनेर तालुक्यातील प्रताप कॉलेज येथे झालेल्या सात दिवशीय रायफल शूटिंग प्रशिक्षण शिबिर यशस्वीरित्या पूर्ण झाले.

या रायफल शूटिंग प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर A B जैन सर यांनी केले या सात दिवसीय शिबिरात धुळे रायफल असोसिएशनचे पदाधिकारी हर्षल भोळे यांचे देखील त्यांना एक दिवसीय मार्गदर्शन लाभले. अमळनेर तालुक्यातून तीन बेस्ट फायर मुलं व मुली यांची निवड करण्यात आली त्यात मुलांमधून प्रथम उदय बहिरम मुलींमधून प्रथम बक्षीस कल्याणी लांडगे ईला मिळाले तसेच त्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला प्रताप कॉलेजचे क्रीडा संचालक अमृत अग्रवाल सर प्रताप कॉलेजचे IQSE कॉर्डिनेटर मुकेश भोळे सर या शिबिराचे प्रशिक्षक दर्शन पाटील जयेश पाटील, निखिल पाटील यज्ञेश बडगुजर, नेहा पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले व सत्कार करण्यात आला.

# डॉ. अल्लामा इक्बाल सेम इंग्लिश स्कूल, रिसोड यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी फूड फेस्टिव्हलचे आयोजन






रिसोड :- शुक्रवारला डॉ. अल्लामा इक्बाल सेमी इंग्लिश प्राइमरी, हायस्कूल आणि ज्यू कॉलेज रिसोड यांच्या वतीने फूड फेस्टिव्हल चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांसोबतच शिक्षक आणि पालक यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देणे, सांस्कृतिक विविधता अनुभवणे आणि आहाराविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

फेस्टिव्हलच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी:

चविष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्स:

विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांनी एकत्रितपणे विविध परंपरागत, प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय खाद्यपदार्थ सादर केले.

- *स्पर्धा आणि सादरीकरणे*:
  - "सर्वोत्कृष्ट पदार्थ स्पर्धा" ज्यामध्ये पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आपापल्या पाककौशल्याचे प्रदर्शन केले.
  - आहार आणि पोषणमूल्यांवर आधारित माहितीपर सत्रे.
- *सांस्कृतिक उपक्रम*:

विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांनीही विविध सांस्कृतिक कार्यक्रमांत सहभागी होऊन वातावरण अधिक रंगतदार बनवले.

शाळेच्या अध्यक्ष प्रा. मोहम्मद कबीर मोहसीन यांनी सांगितले, “फूड फेस्टिव्हल हा विद्यार्थ्यांना, पालकांना आणि शिक्षकांना एकत्र आणणारा उपक्रम असून, यामुळे सृजनशीलता, सांस्कृतिक समरसता आणि एकतेला चालना मिळते.”

फेस्टिव्हलमुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ झाले आणि सर्वांनी हा अनुभव आनंददायी असल्याचे व्यक्त केले.

# जैतपीर प्राथमिक केंद्र शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात






अमळनेर- दि. 21 डिसेंबर. 2024 रोजी जि प उच्च प्राथ.केंद्र शाळा जैतपीर ता. अमळनेर जि. जळगाव येथे चिमुकल्यांचा बाल आनंद मेळावा खूप उत्साहात साजरा करण्यात आला.प्रथम शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ.राजेश्री राजेंद्र पाटील ,मा. सरपंच सौ. संगीता महेंद्र पाटील व मा.उपसरपंच सौ.यशोदाबाई पाटील, बाला उपक्रम समितीचे अध्यक्ष व सदस्य श्री. संजय शिवराम सोनवणे श्री. गोविंदा लोटन पाटील (पोलीस पाटील) या सर्वांनी फित कापून कार्यक्रमाचे उद्घाटन केले व त्यानंतर सरस्वती प्रतिमा चे पूजन करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमाला उपस्थित ग्रामपंचायत सदस्य माननीय सरपंच व माननीय उपसरपंच आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य गावातील ज्येष्ठ श्रेष्ठ नागरिक, अंगणवाडी सेविका व मदतनीस आणि ग्रामपंचायत शिपाई या सर्वांनी कार्यक्रमाला उपस्थित देऊन या बाल आनंद मेळाव्याची शोभा वाढवली. या कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. युवराज पाटील सर यांनी केली. माननीय मुख्याध्यापक श्री वसंत पाटील सर यांनी उपस्थित मान्यवरांचे रुमाल व गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. मेळाव्यात इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी नानाविध प्रकारचे पदार्थ बनवून विक्रीसाठी स्टॉल मांडले होते. त्यामध्ये गुलाबजाम ,भेळ ,पोहे ,खमन,बोर चॉकलेट, वेफर्स पॉपकॉर्न, पास्ता ,मॅगी, उसळ ,कचोरी समोसा ,आलू वडे ,गाजरचा हलवा पाणीपुरी, तिळीचे लाडू ,बासुंदी, भुईमुगाच्या शेंगा, हरभऱ्याची उसळ, आप्पे डोसा आलू पराठा, पोंगा, पापड, इडली, शेव शेंगा, चिक्की, गोड भज्या असे नानाविध पदार्थ विक्रीस ठेवले होते.

गावातील ग्रामस्थ व पालकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. ग्रामस्थ पालक वर्ग यांनी विद्यार्थ्यांनी आणलेल्या पदार्थांचा आस्वाद घेत त्यांना प्रोत्साहन दिले. शाळेचे मुख्याध्यापक श्री वसंत पाटील सर यांनी सर्व मान्यवरांचे, ग्रामस्थांचे खूप खूप आभार मानले या कार्यक्रमासाठी शाळेतील उपशिक्षिका श्रीमती कविता युवराज पाटील,सौ. अर्चना शिवाजीराव पाटील, उपशिक्षक श्री. किरण शिवदास बाविस्कर , श्री. संजय जगन्नाथ शिसोदे ,श्री. राहुल भिकाजिराव सोनवणे सर या सर्वांनी अतोनात मेहनत घेतली होती. तसेच मा.गटशिक्षणाधिकारी दादासो. श्री. रावसाहेब पाटील पं.स. अमळनेर व मा.केंद्रप्रमुख नानासो.दिलीप सोनवणे सर केंद्र-जैतपीर. यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

# माणसाला जिवनात जोडीदार हवाच !

मानवी जीवन जगतांना अनेक नाती मिळतात मित्रही मिळतात मात्र अति उत्तम आणि विश्वासाचे नाते संबंध म्हणजे पत्नीच असते हे मात्र नक्की प्रत्येक सुख , दुःखात अडचणीत समस्येत आपली बायकोच निस्वार्थ पणे उभी असते हे विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी दोघांची वैचारिक पातळी उंचावलेली असावी हेही तितकेच खरे आहे

'या धावणाऱ्या जगात तुम्ही अस्तित्वात आहात...तुम्ही रोजच्या रोज उठला, बसला, झोपला, जेवला याची काळाच्या पटलावर साक्ष असणारी एक तरी व्यक्ती असावी म्हणून खरे तर लग्न करावे.

खरेच आहे, तुम्ही अस्तित्वात आहात याची काल प्रवाहात "सलग दखल"घेणारी एकतरी व्यक्ती या जगात असली पाहिजे ना. बाकीचे नातेवाईक रोजच्या रोज तुमचे अस्तित्व जाणत नाहीत. एका मर्यादे पलीकडे आई वडिलांना ते अशक्य होते आणि लग्न झाल्यावर ते अवघड पण होते.

त्यामुळे आजकालच्या स्वातंत्र्य हवे, लग्न नको..!

या काळात तर खरेच तरुण तरुणींनी हे लक्षात घ्यायला हवे. बाकी शरीर धर्मा व्यतिरिक्त तुमच्या सहअस्तित्वाची दखल या जगडव्याळ विश्वात फक्त तुमचा आयुष्याचा जोडीदारच घेत असतो. बाकी कुणाला खरेच काही पडलेली नसते. जिथे स्वतःसाठी सुध्दा कुणाला वेळ नसतो तिथे दुसरा जगला, मेला कोण बघणार? याशिवाय सुध्दा लग्न हा एक सुंदर सहप्रवास आहे. भल्या मोठ्या विश्वात स्वतःचे छोटेसे विश्व उभे करायचे, चिमणा-चिमणी सारखा काड्या काड्या गोळा करून संसार उभा करायचा, जोडीदाराच्यासह फुलायचे, फळायचे, वाढायचे. मुलांचे संगोपन करायचे, त्यांना दुःखले, खुपले, लागले, सवरले एकत्र जागरण करायचे. आयुष्याचे चटके , दुःख , वेदना एकमेकांच्या साहाय्याने सोसायचे.

अशा रीतीने एकत्र वयस्क होण्यात पण आनंद असतो.

आपल्याला काय आवडते काय नाही, इतकेच काय अंतर्बाह्य आपण कसे आहोत हे आपल्यापेक्षा जास्त आपल्या जोडीदारालाच माहीत असते .

आपल्या कळतेपणाचा सगळाच काळ आपण एकमेकांबरोबर काढत असतो. अगदी तिचे आई वडील लांब आणि त्याचे जवळ असले किंवा नसले तरी ते दोघेच फक्त एकमेकांसाठी पूर्णत्वाने उपलब्ध असतात, असलेच पाहिजेत..!

जोडीदाराच्या भक्कम आधारावरच आपण आपल्या अल्प स्वल्प ताकदीने काही उड्डाण करू शकतो.

चिमणी असो किंवा गरुड, उडून परत येण्यासाठी उबदार घरटे आणि वाट पाहणारा जोडीदार हवाच.

या शिवाय सहचराच्या क्षमता ओळखून त्या फुलवायला पूर्ण शक्तीने पाठींबा दिला तर सोन्याहून पिवळे.

आईवडिलांच्या नंतर आपल्या आनंदात आनंदी आणि दुःखात दुःखी होणारी ती एकमेव व्यक्ती असते.

तुमचा सहचर सतत तुमच्या शेजारी तुमच्यासह उभा असायला हवा, तुमच्या मागे किंवा पुढे नव्हे..!

जर तसे होत असेल तर एका रेषेत येण्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत.

दोन माणसे कधी एकसारखी नसतात, त्यामुळे तुमच्यात मतभेद असणार, भांडणेसुध्दा असणारच. नाही असायलाच हवीत. नुसता होयबा असणारा तो किंवा ती कुणालाच नको असते. पण ते भांडण एका रात्रीत संपायला हवे. भांडणाचे ढग विरल्यानंतर पडणारे स्वच्छ समाधानाचे उन्ह खूप सुंदर असते. ते अनुभवायलाच हवे.

पण त्यासाठी लहानपणापासून स्वतःचे खरे करणाऱ्या नवीन पिढीला अहंकार बाजूला ठेवून ' मी ' ला 'आम्ही' मध्ये विरघळवण्याची कला आली पाहिजे.

पदोपदी अपमान करून नवऱ्याची पुरुषी मानसिकता ठेचून, मी म्हणेन तसेच झाले पाहिजे हा आग्रह पत्नीचा नसावा. कारण अजूनही भारतीय पुरुषसत्ताक पद्धतीत पत्नीने पतीचा सन्मान केला नाही तर बाहेरचे कुणीच करत नाही. मग कुणीही येऊन टपाली मारावी अशी त्या सगळ्याच घराची स्थिती होते आणि पुरुषाने प्रत्येकवेळी स्त्रीच्या थोड्या कमकुवत शरीर मन प्रकृतीचा सतत उध्दार केला तर तिची घरातील पूर्णत्वाने लागलेली सकारात्मक ऊर्जा कमी होते. त्यामुळे घर, मुले एकूणच संसार डळमळीत होतो.

त्यामुळे घरात आणि बाहेर दोघेही एकत्र भक्कम उभे राहिले तर त्यांना कुणीही धक्का देऊ शकणार नाही.

शेवटी दोघांना स्वतःची थोडी मोकळीक देणे हे पण महत्वाचे आहे. स्वतःचे छंद, नातेवाईक, आई वडील, मित्रमंडळी यासाठी ही जागा हवी. कारण प्रत्येकाचे हे बंध वेगवेगळे असतात. ती जागा तुम्ही घेऊ शकत नाही. शेवटी दोघांना करकचून बांधून तीन पायांची शर्यत खेळून तोंडावर पडायचे नसते तर टीम बनून एकमेकांची पाठ राखायची असते

खरे सांगायचे तर भारतीय संसारात नवरा बायकोचे प्रेम हे वेगळे काही नसतेच..!

ते असते दोघांनी एकत्र जे सुख, नव्हे खरेतर दुःख भोगलेले असते त्याचे एक जबरदस्त घट्ट बंधन. ते फक्त पतीपत्नीच्या सातत्यपूर्ण सहअस्तित्वानेच तयार होऊ शकते. नव्हे पिढ्यानपिढ्या सुखी संसारात तसेच झालेले दिसते. तेच बंधन तर भारतीय कुटुंब पद्धतीचा बुलंद पाया आहे असे मला वाटते

**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40



**महत्त्वाचे**

## उपविभागीय अधिकारी खडसे साहेब व देळगाव राजा तहसीलदार डोंगरगारजाळ मॅडम यांच्या लेखी आश्वासनाने शिवणी अरमाळ येथील उपोषण स्थगित

अनिल दराडे: दैनिक विश्वजगत

सिंदखेडराजा : देराजा राजा तालुक्यातील खडकपूर्णाच्या पाठाचे पाणी हे लघु सिंचन



प्रकल्पामध्ये सोडावे या साठी कैलास नागरे यांनी अनेक दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले होते याची प्रकरणाची दखल ब्रेकिंग महाराष्ट्र यानी घेतली होती व त्या गोष्टीचा पाठपुरावा करून अनेक बातम्या सुद्धा प्रकाशित केले होत्या सिंदखेडराजा येथील उपविभागीय अधिकारी खडसे साहेब व देळगाव राजा येथील तहसीलदार मॅडम यांच्या सदर प्रकार हा लक्षात आणून दिला होता तसेच शिवनी आरमाळ येथील उपोषणाच्या पाचव्या दिवशीही महसूल विभागाचे कर्मचारी उपोषण कडे लक्ष नाही या मथळ्याखाली ब्रेकिंग महाराष्ट्राने बातमी प्रकाशित केली होती त्याची दखल घेवून उपविभागीय अधिकारी खडसे साहेब व देऊळगाव राजा तहसीलदार मॅडम यांनी या उपोषणाची दखल घेऊन आज शिवणी अरमाळ येथे येऊन उपोषण करते कैलास नांगरे यांच्या मागणीचे लेखी आश्वासन देऊन सदर उपोषणकर्त्यांच्या अटी ह्या आम्ही समोर पाठवत आहोत व त्याचा पाठपुरावा करू असे लेखी आश्वासन दिल्यामुळे भर थंडीतील कैलास नांगरे यांचे उपोषण मागे घेण्यात आले आहे तसेच कैलास नागरे यांची प्रकृती खालावली असल्याची बातमी सुद्धा ब्रेकिंग महाराष्ट्राने प्रकाशित केली होती सदर मागणी मधील प्रमुख मुद्दा हा शिवणी अरमाळ परिसरातील अंढेरा मेंडगाव अंचरवाडी असोला बायगाव गाव सावखेड नागरे पाडळी शिंदे या गावांमध्ये खडकपूर्णा प्रकल्पांचे पाठाचे पाणी हे परिसरातील लघु प्रकल्प मध्ये सोडल्यास या गावाच्या जमिनी ह्या सिंचनाखाली येऊन हा भाग सुजलम सुपलम होईल ही मागणी घेऊन शिवणी अरमाळ येथील कैलास नागरे यांनी भर थंडीत शिवणी अरमाळ धरणाच्या भिंतीजवळ आमरण उपोषण सुरू केले होते याची दखल ब्रेकिंग महाराष्ट्र ने घेऊन सदर प्रकार हा महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी खडसे साहेब व तहसीलदार मॅडम यांच्या निर्दशनास आणून दिला होता

# एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी कामाच्या मंजुरीची प्रत संजय रायमुलकर यांना दिली.

## मेहकर बसस्थानक कॉंक्रीटीकरणासाठी 4 कोटी 22 लाख रुपये संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून मंजूर

मेहकर -माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून तीन कोटी २५ लाख रुपये खर्चाच्या मेहकर बस स्थानकाचे काम जवळपास पूर्ण झाले असून आता त्यांच्याच प्रयत्नातून बस स्थानक परिसराच्या कॉंक्रिटीकरणासाठी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी ४ कोटी २२ लाख ५० हजार रुपये मंजूर केले असून त्यांनी आदेशाची प्रत काल ता.१९ रोजी नागपूर येथे संजय रायमुलकर यांना दिली.

मेहकर बस स्थानकाचे काम पूर्ण होण्याआधीच एक वर्षापासून




माजी आमदार संजय रायमुलकर यांनी त्यांच्या कार्यकाळात बस स्थानकाच्या कॉंक्रिटीकरणास निधी मिळण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. सदर कामास आता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून त्यासाठीच्या चार कोटी २२ लाख ५० हजार रुपये निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे .सदर आदेशाची प्रत नागपूर येथे विधिमंडळ अधिवेशनादरम्यान एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी संजय रायमुलकर यांना काल दिली.

वाहनतळाचे कॉंक्रिटीकरण करणे , सांडपाण्याचे व्यवस्थापन आणि रेनवॉटर हार्वेस्टिंग ची व्यवस्था करणे यासाठी सदर निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया लवकरच पार पडणार असून त्यानंतर सदर कामास सुरुवात करण्यात येणार आहे. कार्यकारी अभियंता स्थापत्य अभियांत्रिकी विभाग अमरावती यांच्याकडून आता पुढील प्रक्रिया पार पडणार आहे. नव्या बसस्थानकाचे लोकार्पण लवकर व्हावे म्हणून कॉंक्रिटीकरणाचे काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना संजय रायमुलकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

मेहकर एस. टी. आगाराची इमारत नव्याने बांधण्याचा प्रस्तावही माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून अंतिम मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. आगार



कार्यालय इमारत, कार्यशाळा शेड, दुरुस्ती रॅम्प, वाहन परीक्षक खोली परिसराचे कॉंक्रिटीकरण आदींसाठी १४ कोटी रुपयांचा प्रस्ताव देण्यात आला आहे.

## आगामी जि.प,पं.स,न.प च्या निवडणुकीसाठी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी सज्ज व्हावे - वसंतराव भोजने

मलकापुर:- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने यांच्या प्रमुख उपस्थितीत मलकापूर शहर व तालुका शिवसेना पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक दि. 19 डिसेंबर गुरुवार रोजी स्थानिक विश्रामगृहात आयोजित करण्यात आली होती.



मलकापूर शहर व तालुका शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका निवडणुकीसाठी सज्ज राहावे असे आव्हान यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने यांनी केले यावेळी शिवसेना शहर प्रमुख गजानन ठोसर, उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे, उपशहरप्रमुख शकील जमदार, उपशहरप्रमुख शेख समद




कुरेशी, कामगार सेना तालुकाप्रमुख रामभाऊ थोरबोले, कामगार सेना शहरप्रमुख हरीदास गणबास, वाहतूक सेना शहर प्रमुख इमरान लकी, किसान सेना शहर प्रमुख सै. वसीम सै. रहीम, माजी नगरसेवक रवींद्र गव्हाळे, युवासेना तालुकाप्रमुख पवन गरुड, युवासेना उपतालुकाप्रमुख अमित राजपुत, उपतालुकाप्रमुख राजेंद्र काजळे, संतोष बोरले,ईमामभाई,शेख.नासिर, सत्तार शाह, यासिन कुरेशी,ईसाक तेली,हासिमभाई, जुबेर भाई,माजीद, ईमरानभाई,फयेजभाई,सह शिवसेना व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा मुंबई घिर्णी शाळेचे घवघवीत यश

मलकापूर - जि प मराठी उच्च प्राथमिक शाळा घिर्णी शाळेत अवघड समजल्या जाणाऱ्या व महत्त्वाची राज्यस्तरीय डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत वर्ग सहावीचे अकरा विद्यार्थी प्रवेशित झाले होते. त्यापैकी आज दिनांक 20 डिसेंबर 2024 रोजी पाच विद्यार्थी उत्तीर्ण होऊन त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. घिर्णी शाळेमध्ये राष्ट्रीय स्तरावरील एन एम एम एस परीक्षा, राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे परीक्षा, भारत टॅलेंट सर्च परीक्षा, राज्यस्तरीय आय एम विनर परीक्षा, राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा, मराठी भाषा ऑलंपियाड परीक्षा, गणित प्रज्ञाशोध अध्यापक मंडळ परीक्षा, एकलव्य ज्ञानवर्धिनी



स्पर्धा परीक्षा, लक्षवेध प्रज्ञाशोध परीक्षा, मंथन पब्लिकेशन प्रज्ञाशोध परीक्षा इत्यादी परीक्षांना विद्यार्थ्यांना बसून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यात येत आहे. विद्यार्थी परीक्षाभिमुख अभ्यास करून स्वतःच्या व शाळेच्या गुणवत्तेत वाढ करत आहे. ही घिर्णी गाववासियांच्या आणि शाळेच्या दृष्टिकोनातून अभिमानास्पद बाब आहे. वरील डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवल्याबद्दल गावातून व परिसरातून सर्वत्र त्यांचे कौतुक होत असून विद्यार्थी यशाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक, वर्गशिक्षिका आणि मार्गदर्शक शिक्षक व आई-वडील यांना देतात.




## सिंदखेडराजा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात 52 व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन

सिंदखेडराजा:- येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ५२ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. विज्ञान शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष दीपक नागरे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली यासंदर्भात काल दि. २० डिसेंबर, शुक्रवारी पूर्व नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षण अधिकारी भास्कर वाघमारे तर महाविद्यालयाचे प्राचार्य रामप्रसाद ठाकरे, विषयतज्ञ प्रवीण गवई, दिलीप काकडे आदि प्रमुख उपस्थितीत होते. याप्रसंगी गटशिक्षण अधिकारी भास्कर वाघमारे यांनी या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीमध्ये सर्वच शाळांतील विद्यार्थी, विज्ञान शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर आदिंनी सहभागी होण्याचे आवाहन केले. यामध्ये प्रामुख्याने तालुक्यातील शाळांमधील ६ वी ते ८ वी व ९ ते १२ वीच्या विज्ञान शिक्षकांनी पुढाकार घेवुन विद्यार्थ्यांना सहभागी करावे तसेच शिक्षकांनी स्वतः शैक्षणिक






साहित्य तसेच संकल्पना स्पष्ट करणारी विविध उपकरणे तयार करुन प्रदर्शनात सहभागी होण्याचे निर्देश दिले. मार्गदर्शनपर भाषणात विज्ञान शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष दीपक नागरे यांनी आपली उपकरणे ही सर्वसामान्य नागरिकांना कशी फायदेशीर होवू शकतील असा प्रयत्न झाला पाहिजे असेही स्पष्ट केले. बैठकीतील नाविन्यपूर्ण कल्पनांचे स्वागत करीत, विज्ञान प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी तालुक्यातील सर्व विज्ञान शिक्षकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. विज्ञान प्रदर्शनीच्या दोन दिवसीय कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार मनोज नंदाताई देवानंद कायंदे, शाळा संस्थेचे अध्यक्ष भागोजी पुंजाजी तायडे, सचिव त्र्यंबकराव म्हातारजी ठाकरे व संचालक मंडळ तसेच शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर या दरम्यान विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी वजने व मापे अधिकारी वैभव अलका भानुदास लव्हाळे हे मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीला प्राचार्य उध्दव दराडे, सुचिता इठोळे, एम. एस. गीते, श्रीराम भोसले, वैशाली सरोदे, अश्विनी मेहेत्रे, अशोक जायभाये, भानुदास लव्हाळे, श्रीधर जायभाये, एस. टी. तायडे, गैबीनंद घुगे, गजानन काळे, रामदास सानप, सुहास भावसार, संदीप फड, बैठकीचे संचलन अशोक तायडे व आभार प्रदर्शन सतीश तिडके यांनी केले.

## दिव्यातील डॉन बॉस्को हायस्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न.

ठाणे, दिवा : दिव्यातील डॉन बोस्को हायस्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन दिवा पुर्व येथील नागनाथ मंदिर येथील भव्य मैदानात पार पडले. प्रसंगी दिवा पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक राजेंद्र तोरडमल यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रसंगी छोटा शिशू ते इयत्ता १० वी पर्यंतच्या अनेक स्पर्धेत विशेष प्रविण्य मिळवलेले यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रशिस्ती पत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. डॉन बोस्को या इंग्रजी माध्यम असलेल्या हायस्कुलमध्ये सी बी एस सी व महाराष्ट्र बोर्ड या दोन्ही माध्यमातून विध्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. दरवर्षी शाळेत निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा, तसेच विविध प्रकारचे खेळ तसेच इतर सांस्कृतिक उपक्रम राबविले जात असून शाळेने अनेक यशस्वी विद्यार्थी घडवण्याचे धैर्य दाखवून उच्च शिक्षण देत आहे.




वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी अनेक शालेय मुलामुलींनी आपला कला अविष्कार दाखवत नृत्य साजरे






केले. प्रसंगी मुख्याध्यापक रामबाबू राय यांच्यासह अखिलेश सिंग, शिरंजनदेवी राय, साक्षी सिंग तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व अनेक मान्यवर व शेकडो विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## नगरपालिकेचे झोपेचे सोंग ;सिंदखेड राजा नगरपालिकेचे सार्वजनिक शौचालयाकडे दुर्लक्ष

सिंदखेड राजा - सिंदखेड राजा येथील जिजामाता नगर मधील सार्वजनिक दोन शौचालय असून त्या शौचालयाची अवस्था भयानक झाली आहे,त्याकडे सिंदखेड राजा नगरपालिकेचे दुर्लक्ष दिसून येत आहे. या शहरात 12 जानेवारीला जिजामाता जन्मोत्सव साजरा होत असून नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून सार्वजनिक शौचालय दुरुस्तीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मुख्याधिकारी सिंदखेडराजा यांना निवेदन देण्यात आले.दिलेल्या निवेदनात सिंदखेड राजा येथील, लखोजीराव जाधव यांच्या राजवाडा परिसरात तसेच जिजामाता नगर मधील बंद पडलेली शौचालये लवकरात लवकर नगरपालिकेने चालू करा किंवा इतर पर्यायी सार्वजनिक शौचालयांची सोय उपलब्ध करून द्यावी ही मागणी जनतेकडून होत आहे. या ठिकाणची सार्वजनिक शौचालय बंद अवस्थेत असल्यामुळे सिंदखेड






राजा शहरातील जिजामाता नगर येथील नागरिकांची गैरसोय होत आहे याकडे नगरपालिकेचे गेल्या पाच ते सहा महिन्यापासून दुर्लक्ष होत असल्याचे तेथील नागरिक सांगत आहे. जिजामाता जन्मोत्सव सोहळा 12 जानेवारी ला मोठ्या उत्साहात येथे साजरा केला जातो,परंतु या ऐतिहासिक नगरी सिंदखेड राजा शहरात पर्यटन स्थळे असलेल्या ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची अवस्था चांगली असणे फार गरजेचे आहे.शौचालयाची अवस्था चांगली असल्याने नागरिकांची गैरसोय होणार नाही,त्याचबरोबर पसरणाऱ्या रोगराईला आळा बसेल. हे देखील नगरपालिकेने लक्षात घ्यायला हवे म्हणून सिंदखेड राजा मधील बंद अवस्थेत असलेले शौचालय 12 जानेवारीच्या पूर्वी साफसफाई व दुरुस्ती करून चालू करण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही.

या ऐतिहासिक नगरीत अनेक सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली तर पर्यटकांची गैरसोय होणार नाही. त्याचप्रमाणे टी पॉइंट येथे नागरिकांसाठी शौचालय बांधण्यासाठी नगरपालिकेने पुढाकार घ्यावा,जेणेकरून या ठिकाणी देखील प्रवाशांची गैरसोय होत असल्याचं दिसत आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेवर प्रशासकीय कालावधीत दोन वर्षांत चार कोटी 75लाख खर्चाची विकास कामे पूर्ण तर चार कोटी 50लाख रुपयांची कामे प्रगतीपथावर-मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार

नळदुर्ग - नळदुर्ग नगरपालिकेवर प्रशासकीय कालावधी असताना सन 2022 ते 2024 या दोन वर्षाच्या कालावधीत नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी अतिशय चांगल्या प्रकारे विकास कामांचे नियोजन करुन तब्बल 4 कोटी 75 लाख रुपये खर्चाची विकास कामे पुर्ण करुन शहराचा विकास केला आहे. त्याचबरोबर 4 कोटी 50 लाख रुपये खर्चाची विकास कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे प्रशासकीय कालावधीत मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.

नळदुर्ग नगरपालिकेवर गेल्या तीन वर्षांपासुन प्रशासकीय कारभार सुरु आहे. प्रशासकीय कालावधीत नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परीक्षेत्रात अधिसुचित क्षेत्रात नागरी सेवा पुरविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, महाराष्ट्र सुवर्ण




जयंती नगरोथान महाअभियान योजना, वैशिष्ट्येपुर्ण योजना व नळदुर्ग नगरपरिषद जिल्हा नियोजन समिती या योजनेअंतर्गत शहरातील विविध भागात कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे केली आहेत. यामध्ये सन 2022--23 या वर्षात एकुन 32 कमांपैकी 23 कामे पुर्ण केली



आहेत या 23 कामांवर 3 कोटी 63 लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. या वर्षातील 29 लाख रुपये खर्चाची 2 कामे प्रगती पथावर आहेत.

2023--24 या वर्षात विविध योजनेअंतर्गत एकुन 33 कामांना मंजुरी मिळाली आहे. यापैकी 8 कामे पुर्ण झाली आहेत तर 8 कामे प्रगतीपथावर आहेत. 13 कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. नागरीकांच्या तक्रारीमुळे 2 कामे बंद आहेत तर जागेच्या अडचणीमुळे एक काम




बंद आहे. या वर्षात 1 कोटी रुपये खर्चाची विकास कामे पुर्ण झाली आहेत तर सध्या 4 कोटी रुपये खर्चाची विकास कामे प्रगतीपथावर आहेत.

सन 2024--25 या चालु वर्षात 5 कोटी रुपये खर्चाच्या विकास कामांना मंजुरी मिळाली असुन या कामाची टेंडर प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे.

शहरात विविध भागात करण्यात आलेल्या विकास कामांमध्ये सिमेंट रस्ते, गटार बांधणे, स्वच्छता गृह बांधणे, गार्डन विकसित करणे, मंदिराला संरक्षक भिंत बांधणे, ओपन स्पेस विकसित करणे, सार्वजनिक सभागृह बांधणे, सार्वजनिक सभामंडप बांधणे व अंगणवाडी इमारतीचे बांधकाम करणे या कामांचा समावेश आहे. मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी प्रशासकीय कालावधीत शहरात विकास कामे करीत असतांना सर्व जाती धर्मातील लोकांसाठी ही विकास कामे केली आहेत. त्यामुळे प्रशासकीय कालावधीत मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी शहराचा विकास थांबु न देता तो वेगाने पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेला योग्य व अचुक प्रस्ताव तसेच आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी शासन दरबारी केलेल्या प्रयत्नामुळे आज नळदुर्ग शहरात 46 कोटी रुपये खर्चाच्या पाणिपुरवठा योजनेचे काम सुरु आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर शहरवासियांना दररोज पाणी मिळणार आहे.